सामना पा.नं.५.

मीरा-भाईंदर गुटखा वसुली प्रकरण

# हवालदाराने घेतलेली लाच वरिष्ठांना भोवली

## मुख्यालयात तडकाफडकी बदली



भाईंदर, दि. ३ (सा.वा.) - गुटखा विक्रीसाठी महिना आठ हजार रुपये लाच घेताना नवघर पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्याला चार दिवसांपूर्वी एसीबीने रंगेहाथ अटक केली होती. मीरा-भाईंदरमधील या गुटखा वसुली प्रकरणाचा दणका मात्र लाचखोर कर्मचाऱ्याच्या वरिष्ठांना बसला आहे. याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद देसाई यांची तडकाफडकी पोलीस मुख्यालयात बदली करण्यात आली आहे. त्यामुळे गुटख्याच्या आडून लाचखोरीचा गोरखधंदा थाटलेल्या खाकी वर्दीतील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

महाराष्ट्रात गुटखा विक्रीला बंदी असतानाही त्याची विक्री करण्यासाठी महिना आठ हजार रुपयांची लाच घेताना नवघर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार अमित पाटील यांना रंगेहाथ पकडण्यात आले होते. त्यामुळे पोलीस व गुटखा विक्रेत्यांचे कनेक्शन थेट समोर आले. या घटनेला चार दिवस उलटत नाही तोच नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद देसाई यांची पोलीस मुख्यालयात बदली करण्यात आली. नवघर पोलीस ठाण्यात देसाई गेल्या दोन वर्षांपासून कार्यरत होते. त्यांच्या सेवानिवृत्तीला काही महिने शिल्लक असतानाच ही बदली करण्यात आल्याने पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे.

### गुटखामाफिया सक्रिय

मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गुटखामाफिया सक्रिय झाले आहेत. पोलीस कर्मचाऱ्यांना हाताशी धरून गुटखा विक्रीच्या धंद्यात स्थानिक टोळ्यांनी जम बसवला आहे. या कारवाईनंतर त्याला काहीसा आळा बसण्याची शक्यता आहे. देसाई यांच्या जागी काशिमीरा पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार यांची यादरम्यान नियुक्ती करण्यात आली आहे, तर विजय पवार यांच्या जागी पोलीस मुख्यालयात विशेष शाखेतील कुमारगौरव धादवड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सकाळ पु-पा-१.

# उत्तन कचराभूमीला पुन्हा आग

## अग्निशमन दलकडून आगीवर दीड तासात नियंत्रण

भाईंदर, ता. ३ (बातमीदार) : उत्तन येथे उघड्यावर साठवून ठेवलेल्या कचऱ्याला रविवारी रात्री पुन्हा एकदा आग लागल्याची घटना घडली. मात्र महापालिकेने कचराभुमीवर अग्निशमन दलाच्या गाड्या तैनात ठेवल्या असल्यामुळे आगीवर तातडीने नियंत्रण मिळवणे शक्य झाले आहे.

उत्तन कचराभुमीतील कचऱ्याला फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात पंधरा दिवसाच्या अंतराने दोन वेळा आग लागली होती. ही आग पुढे तीन ते चार दिवस धुमसत राहिल्याने धूर पसरुन स्थानिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला होता. त्यामुळे महापालिकेने आता कचराभुमीवरच अग्निशमन दलाच्या गाड्या चोवीस तास तैनात केल्या आहेत. रविवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास कचऱ्याने पुन्हा एकदा पेट घेतला. मात्र अग्निशमन दल तयारच असल्यामुळे या आगीवर अवघ्या एक ते दीड तासात नियंत्रण मिळविण्यात आले.

### बायोमायनिंग सुरू

सध्या कचराभुमीवर बायोमायनिंग या तंत्राद्वारे प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यात साठून राहिलेल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती केली जाणार असून पावसाळ्यापर्यंत कचराभुमीवरील ८० टक्के कचरा नष्ट केला जाईल, असा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. त्यामुळे आगामी काळात कचऱ्याला आग लागण्याच्या घटनांपासून स्थानिकांना दिलासा मिळेल असे प्रशासनाचे म्हणणे आहे.

CamScanner

पुढारी ५-५-२.

# नामांकित कंपन्यांच्या कागदपत्रांमध्ये फेरफार; बनावट वाहन विम्याद्वारे वसईकरांना गंडा

## ३५०० बनावट वाहन विमे बनविल्याची शक्यता; गुन्हा दाखल



**वसई : पुढारी वृत्तसेवा**

वसईत नामांकित विमा कंपन्यांच्या कागदपत्रांमध्ये फेरफार करून वाहन मालकांची फसवणूक केल्याप्रकरणी एका विमा एजंटविरोधात माणिकपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसईतील सामाजिक कार्यकर्ते मितेश मोदी यांनी वाहन विमा एजंट अतुल नागडा यांच्याकडून त्यांच्या कारचा विमा काढला होता. विमा काढल्यानंतर लगेचच एचडीएफसी अर्गो या नामांकित विमा कंपनीने मोदी यांना पत्र पाठवून विम्याची मुदत संपल्याचे कळवले. त्यावेळी विमा काढला असतानाही मुदत लगेचच कशी काय संपली? याची चौकशी केल्यानंतर विम्याची कागदपत्रे बनावट असल्याची माहिती मोदी यांना मिळाली. एका टोळीकडून असे ३५०० विमे बनावट तयार करण्यात येऊन, हजारो रुपयांचा अपहार करण्यात आला असल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या प्रकरणी वूमन्स प्राईड असोसिएशनच्या अध्यक्षा सौ. निभा मितेश मोदी आणि त्यांचे पती मितेश मोदी यांनी अधिक माहिती मिळवली असता, त्यांची विमा पॉलिसी बनावट असल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यांनी माणिकपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास केला असता, तेही चक्रावून गेले. मोदी यांनी चारचाकी वाहनांचा विमा काढला होता. मात्र, कंपनीच्या अधिकृत विमा कागदपत्रात फेरफार करून दुचाकीचा विमा काढण्यात आला होता. विमा एजंड अतुल नागडा याने कंपनीच्या कागदपत्रांत फेरफार करून हजारो विमा काढून नागरिकांची फसवणूक केल्याचे आता पोलीस तपासात समोर आले आहे.

दरम्यान, वसई विरार परिसरात बनावट विमा काढणारी एक टोळी काही वर्षांपूर्वी पोलिसांनी उध्वस्त केली होती. रिक्षा, टेम्पो, ट्रक आदींचा बनावट कागदपत्रांच्या आधारे विमा काढून आरटीओचीही फसवणुक केली जात असल्याचेही त्यावेळी उजेडात आले होते. ही टोळी पुन्हा एकदा सक्रीय झाल्याचे आता तपासावरून उजेडात येऊ लागले आहे. या प्रकरणातील आरोपी अतुल नागडा यास लवकरच अटक करण्यात येणार असल्याचे माणिकपूरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील यांनी सांगितले.

# वसईत अनधिकृत बांधकामांना वीजपुरवठा

## माहिती देण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देश

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरार महानगरात बेकायदा बांधकामे मोठ्या प्रमाणात होत आहेत. ही बांधकामे वीज पुरवठा होत असल्याने वाढत आहेत. या बांधकामांना वीज पुरवठा कसा केला जातो, याची माहिती महावितरणने मागणाऱ्याला द्यावी, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. एका माहिती अधिकारात हा निकाल देण्यात आला आहे.

नियोजन प्राधिकरणाने अनधिकृत ठरवलेल्या बांधकामांना नवीन वीज मीटर जोडण्या देऊ नयेत,असे स्पष्ट आदेश असतानाही महावितरणने वसई-विरार शहरात आदेश धाब्यावर बसवून वीज जोडण्या दिल्या आहेत. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात महावितरणविरोधात सुमोटो जनहित याचिका २०१८ मध्ये दाखल झाली होती. त्यावेळी संबंधित नियोजन प्राधिकरणाने अनधिकृत ठरवलेल्या बांधकामांना नवीन वीजमीटर जोडण्या देऊ नयेत, असे स्पष्ट आदेश महावितरणला खंडपीठाने दिले होते.


वसई परिमंडळातील वसई-विरार शहरात अनधिकृत चाळी, इमारती, गाळे, गोडाऊन, कंपन्यांना मिळून वीस हजारहून अधिक घरगुती औद्योगिक आणि व्यावसायिक नवीन वीज मीटर जोडण्या दिल्या गेल्या आहेत. त्याची माहिती अधिकार कार्यकर्ते चंदू पाटील यांनी महावितरणकडे माहिती मागितली होती; पण महावितरणकडून माहिती देण्यास टाळाटाळ केली जात होती. त्यामुळे चंदू पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती.

या प्रकरणी हायकोर्टाचे मुख्य न्यायमूर्ती एस.व्ही.गंगापूरवाला आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. शहरांमध्ये बेकायदा बांधकामांना उत आला असून महावितरण विभागाकडून या व्यावसायीकांना वीज जोडण्या दिल्या जात आहेत.

पुढारी ५-४-२.

# सूर्या प्रकल्पातील अतिरिक्त पाणी लांबणीवर?

## उन्हाळ्यात वसईकरांमध्ये पाणीबाणीची भीती



**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

वसई विरार शहराचे झपाट्याने नागरीकरण वाढत आहे. त्यामुळे शहरात पाण्याची मागणी ही प्रचंड वाढली आहे. सध्या पालिकेकडे सुर्या, पेल्हार व उसगाव या तिन्ही धरणातून दररोज २३० दशलक्ष लीटर इतका पाणी पुरवठा केला जातो. मात्र मिळणारे पाणी ही आता अपुरे पडू लागले आहे. त्यामुळे नागरिकांना पाणी टंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. मार्च अखेर पर्यंत सुर्या प्रकल्पातील १८५ दशलक्ष लिटर अतिरिक्त पाणी आणण्याची घोषणा व्यर्थ ठरली आहे. वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण न झाल्याने हे पाणी आता लांबणीवर पडले असून ते जूनपर्यंत मिळणार असल्याचे पालिका प्रशासनाने सांगितले. त्यामुळे यंदा उन्हाळ्यात देखील वसईकरांना पाणीटंचाईच्या झळा सोंसाव्या लागणार असून पाण्याअभावी नागरिकांचे हाल होणार आहेत.

शहरात पाण्याची समस्या सुटावी यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) हाती घेण्यात आलेल्या सूर्या प्रादेशिक प्रकल्प ४०३ दशलक्ष लिटर्स पाण्याची योजना आहे. त्यातील वसई विरार शहराला जवळपास १८५ दशलक्ष लीटर इतके पाणी उपलब्ध होणार आहे. एमएमआरडीए मार्फत हे पाणी महामार्गाजवळील काशिद कोपर पर्यंत आणले जाणार आहे. त्यानंतर एमबीआर मधून पाणी पालिकेकडून जलवाहिन्या अंथरून वितरित केले जाणार आहे.

> सूर्याप्रकल्पातून मिळणारे १८५ एमएलडी पाणी शहरात आणण्यासाठी जलवाहिन्या अंथरण्याचे काम सुरू आहे. लवकर हे काम पूर्ण करून नागरिकांना पाणी देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.
>
> **-तानाजी नरळे,**
> उपायुक्त (पाणीपुरवठा) महापालिका

मार्च अखेरीसपर्यंत हे पाणी आणले जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. मात्र वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण झाले मार्च महिना संपत आला तरीही हे काम अजूनही पूर्ण न झाल्याने १८५ मिळणारे अतिरिक्त पाणी लांबणीवर पडले आहे.

पुण्यनगरी ५-४-१.

# चार वर्षांत ४५ गुन्हे; ७२ जणांना अटक

## मीरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालयात अवैध शस्त्रे बाळगण्याचे वाढले प्रमाण



**मीरा रोड** : मीरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये २०१९ पासून अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्या व त्याची विक्री करण्यासाठी आलेल्या व्यक्तींवर गेल्या चार वर्षांत ४५ गुन्हे दाखल झाले असून ७२ आरोपींना अटक करण्यात आली. त्यातील आरोपींना शिक्षा देखील झाली आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये १७ पोलीस ठाणी कार्यरत आहेत. या सर्व पोलीस ठाणी कार्यक्षेत्रामध्ये शांतता, कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, नागरिकांचे जीवित व वित्त सुरक्षित राहण्याची तसेच समाजकंटक व गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर प्रतिबंधक कारवाई करणे सोपे व्हावे यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ चे पोटकलम (१) व (३) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत. यामध्ये कोणत्याही नागरिकांच्या शरीरास इजा होईल अशा प्रकारची कोणतीही शस्त्रे जवळ ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे.

मनाई आदेशाचा भंग करणाऱ्यावर पोलिसांकडून कारवाई करण्यात येते व यापुढे देखील कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस आयुक्तालयाकडून सांगण्यात आले. असे मनाई आदेश असताना देखील काही व्यक्तींनी या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. आयुक्तालयातील सर्व पोलिस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये अवैध पिस्तूल बाळगणाऱ्यावर २०१९ मध्ये १६ गुन्हे दाखल असून ३२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर त्यांच्याकडून देशी कट्टे ११, पिस्तूल ७, बोअर पिस्तूल १, काडतूस ४१ असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. २०२० साली ३ गुन्हे दाखल असून ४ आरोपींना अटक करून त्यांच्याकडून गावठी कट्टे २, बनावट ९ एमएम पिस्तूल-१ असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. २०२१ मध्ये १५ गुन्हे दाखल असून ३२ आरोपींना अटक करून त्यांच्याकडून गावठी कट्टे १५, पिस्तूल १, बारा बोअर १, काडतूस २५ असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. २०२२ मध्ये एक गुन्हा दाखल असून एका आरोपीला अटक करून २४ काडतुसे जमा करण्यात आली आहेत. तर १ जानेवारी २०२३ ते ३० मार्च २०२३ या तीन महिन्यांमध्ये ५ गुन्हे दाखल असून ७ आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून गावठी पिस्तूल, गावठी कट्टा, देशी पिस्तूल व १० जिवंत काडतुसे जमा करण्यात आली आहेत.

CS CamScanner

लोकसत्ता ५.५.१४.

# नालासोपाऱ्यातून कारटेप चोरणारे अटकेत

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** महागड्या मोटारींमधील कारटेप चोरणाऱ्या दोन आरोपींना विरार गुन्हे कक्ष ३ च्या पथकाने नालासोपारा येथून अटक केली आहे. या आरोपींकडून पाच लाख सहा हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करून सहा गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

वसई-विरार शहरात घरफोडी, वाहनचोरी सोबतच महागड्या मोटारींमधील म्युझिक सिस्टीम, टेप यांची चोरी वाढली होती. विरार येथे सौमिल संदीप मनकीकर यांच्या चारचाकी वाहनातून एलइडी म्युझिक सिस्टीम चोरीला गेली होती. याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता.

या गुन्ह्याचा तपास विरार गुन्हे कक्ष ३ च्या पथकाने वरिष्ठांच्या सूचनेनुसार सुरू केला होता. घटनास्थळी मिळालेली माहिती व गुप्त माहितीच्या आधारे शोध घेऊन दोन आरोपींना नालासोपारा पूर्वेच्या बिलालपाडा येथून अटक केली आहे.

अंजू मुकेश बधानी व सरिता गणेश लिंगम, अशी अटक आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून चोरी करण्यासाठी वापरलेल्या वाहनासह सहा कारटेप, असा पाच लाख सहा हजार ५५० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. तर, विरार, अर्नाळा, तुळींज या पोलीस ठाण्यात दाखल असलेले सहा गुन्हे उघडकीस आणले आहेत.

पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी खाडे, उमेश भागवत, पोलीस हवालदार अशोक पाटील, मुकेश तटकरे, सागर बारवकर, सचिन घेरे यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.



# नायब तहसीलदारांचे 'काम बंद'

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** राजपत्रित वर्ग-२ नायब तहसीलदार या कार्यकारी पदाच्या विद्यमान वेतनश्रेणीच्या मुद्द्यावरून तहसीलदार व नायब तहसीलदार यांनी सोमवारपासून काम बंद आंदोलन केले. त्यात राज्यासह पालघर जिल्ह्यातील तहसीलदार व नायब तहसीलदार सहभागी झाले होते.

महसूल खात्यातील नायब तहसीलदारांना सन १९९८ मध्ये राजपत्रित अधिकाऱ्यांचा दर्जा (वर्ग-२) देण्यात आला असताना वेतनश्रेणी मात्र वर्ग ३ च्या पदाची देण्यात आली आहे. त्यामुळे नायब तहसीलदार या पदाची वेतनश्रेणी चार हजार ३०० वरून चार हजार ८०० रुपये वाढवण्यात यावी, अशी मागणी नायब तहसीलदारांनी केली आहे.

मागील अनेक वर्षांपासून शासनाकडे नायब तहसीलदार व त्यांच्या संघटनांनी वेतनश्रेणी वाढविण्यात यावी, अशी मागणी केली होती. मात्र, या मागणीकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने नायब तहसीलदार यांच्या संघटनेने सोमवारपासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. त्यात वसईसह पालघर जिल्ह्यातील नायब तहसीलदार सहभागी झाले आहेत.

या आंदोलनामुळे तहसील विभागातील कामे रखडली असून, त्याचा फटका तहसील कार्यालयात विविध कामांनिमित्त येणारे नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थी यांना बसत आहे.

CamScanner

लोकसत्ता ५.५१.९.



# वसई पूर्व परिसरात भूमाफियांकडून नदीमध्ये अतिक्रमण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसईः** वसई पूर्वेच्या भागातील कामण सागपाडा नदीत भूमाफियांनी अतिक्रमण केल्याचा प्रकार समोर आला आहे. या अतिक्रमणामुळे पाणी जाण्याचा नैसर्गिक मार्ग बंद होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

वसई पूर्वेच्या भागात कामण सागपाडा नदी आहे. या नदीतून चिंचोटी डोंगरातून येणारे पावसाचे पाणी वाहून जाते. हा पाणी जाण्याचा नैसर्गिक मार्ग आहे. मात्र मागील काही वर्षांपासून कामण परिसरात भूमाफियांकडून अतिक्रमण करून नैसर्गिक मार्ग बुजविण्याचे काम सुरू आहे.

नुकताच कामण सागपाडा नदीवर अतिक्रमण करण्यात आले आहे. पाण्याची समस्या सुटावी व पावसाचे पाणी अडवून राहावे यासाठी जवळपास ५० वर्षांपूर्वी जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाकडून बंधारा तयार करण्यात आला आहे. या बंधाऱ्यावर भूमाफियांनी भिंत उभारली आहे. तर नदीवर ये-जा करण्याचा मार्गही चारही बाजूंनी बंद करून अतिक्रमण सुरू असलेल्या प्रकाराकडे प्रशासनाने लक्ष दिले नाही तर कामण - सागपाडा नदी नष्ट होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.


> **“कामण सागपाडा ही नदी फार जुनी नदी आहे. यातूनच पावसाळ्यात पाण्याचा निचरा होत असतो. मात्र आता त्यावर अतिक्रमण झाल्याने नैसर्गिक मार्ग बंद झाला आहे. यावर प्रशासनाने लक्ष देऊन कारवाई करावी अशी मागणी आम्ही करीत आहोत. - ॲड. दिनेश म्हात्रे,** सामाजिक कार्यकर्ते वसई.

विशेषतः पावसाळ्यात डोंगर परिसरातून प्रचंड वेगाने पाणी येत असते. कधी कधी या भागातील नदीला पूरही येतो. याचा फटका नागरिकांना बसतो. जर नदीवरील होत असलेल्या अतिक्रमणामुळे जर पाणी जाण्याचा मार्गच बंद झाला तर पूरस्थिती निर्माण होऊ शकते असे सामाजिक कार्यकर्ते ॲड. दिनेश म्हात्रे यांनी सांगितले आहे.

यावर कारवाई व्हावी यासाठी पालिकेच्या प्रभाग समिती जी च्या सहायक आयुक्तांना पत्र देण्यात आले आहे.

CamScanner

लोकसत्ता ५.५.१७.



# खुल्या मैदानात पोलिसांची परीक्षा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातर्फे पोलीस भरती प्रवेशाची लेखी परीक्षा रविवारी पार पडली. भाईंदरच्या सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे मैदानात तब्बल १२ हजार १५९ उमेदवारांनी लेखी परीक्षा दिली. मागील तीन महिन्यांपासून सुरू असलेली ही प्रवेश प्रक्रिया संपली असून लेखी परीक्षेचा निकाल येत्या आठवड्याभरात जाहीर केला जाणार आहे.

मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस शिपाई आणि चालक मिळून ९९६ पदांसाठी पोलीस भरती प्रक्रिया २ जानेवारीपासून सुरू करण्यात आली. या ९९६ जागांसाठी एकूण ७१ हजार उमेदवारांनी अर्ज केले होते. त्यातील ४९ हजार ४७९ जण शारीरिक चाचणी परीक्षेसाठी हजर होते. त्यामध्ये १२ हजार १५९ उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र ठरले. १० चालक पदासाठी पात्र ठरलेल्या १०४ उमेदवारांची लेखी चाचणी रविवार २६ मार्च रोजी मीरा रोड येथील मुख्यालय सभागृहात पार पडली. त्यानंतर महिला आणि पुरुष शिपाई पदासाठी लेखी परीक्षा भाईंदर येथे पार पडली. पुरुषांची लेखी परीक्षा सुभाषचंद्र बोस मैदानात तर महिलांची लेखी परीक्षा बाळासाहेब ठाकरे मैदानात पार पडली. ९ हजार पुरुष आणि ३ हजार महिला उमेदवार या लेखी परीक्षेसाठी बसले होते. पोलीस भरती प्रक्रिया पूर्ण झाली असून ती सुरळीत पार पडली आहे. लेखी परीक्षेचा निकाल येत्या आठवड्याभरात लावला जाणार आहे. उत्तीर्ण उमेदवारांना लगेच आयुक्तालयातील सेवेत सामावून घेतले जाणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त प्रकाश गायकवाड (मुख्यालय) यांनी दिली.

## परीक्षार्थी उमेदवारांची नाराजी

उमेदवारांची लेखी परीक्षा सकाळी साडेआठ ते साडेदहा या वेळेत घेण्यात आली. मात्र ती बंदिस्त सभागृहात न घेता खुल्या मैदानात घेण्यात आली. उमेदवारांना खाली बसून लेखी पेपर सोडवावा लागला होता. त्याबद्दल काही उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली. लेखी परीक्षा शाळा, महाविद्यालयात घेतली असती तर पेपर सोडविणे सोपे गेले असते असे या उमेदवारांनी सांगितले. मात्र १२ हजार उमेदवारांच्या लेखी परीक्षा शाळा, महाविद्यालयातील वर्गात घेणे शक्य नसते. ही परीक्षा पारदर्शी वातावरणात होणे गरजेचे असते. त्यामुळे परीक्षा देणाऱ्या उमेदवारांना बारकाईने लक्ष ठेवणे, त्यांना नियंत्रण करणे सोपे जावे यासाठी खुल्या मैदानात परीक्षा घेतली जाते. संपूर्ण महाराष्ट्रात अशीच पद्धत असते, अशी माहिती पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी दिली. लेखी परीक्षा खुल्या मैदानात खाली बसून द्यावी लागणार आहे, याची पूर्ण कल्पना उमेदवारांना देण्यात आलेली असते आणि त्यानुसार ते खाली बसून लिहिण्याचा सराव करून आलेले असतात असेही गायकवाड यांनी स्पष्ट केले.

लोकसत्ता ५.५.१

# महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी उपाययोजना

## परिवहन विभागाचा अहवाल तयार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई** : मुंबई-अहमदाबाद महामार्गावर होणाऱ्या अपघाताच्या घटना रोखण्याच्या दृष्टिकोनातून उपप्रादेशिक परिवहन विभाग वसई यांच्यातर्फे आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये महामार्गावर निर्माण होत असलेल्या अपघात व इतर समस्या व त्यावर उपाययोजना याबाबतचा अहवाल परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी तयार केला आहे.

> “महामार्गावर अपघात होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. रस्ते सुरक्षेच्या अनुषंगाने आम्ही परिवहन विभागाची पथके तयार करून समस्या जाणून घेतल्या आहेत. त्यावर आवश्यक असलेल्या उपाययोजनाही प्राधिकरणाला सुचविल्या आहेत.
>
> **- दशरथ वाघुले,**
> उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, वसई.

वसई तालुक्यातून मुंबई व गुजरात यांना जोडणाऱ्या या महामार्गावर निर्माण होत असलेल्या विविध समस्यांमुळे अपघाताच्या घटना समोर येत आहेत. वर्सोवा पुलापासून ते पालघर अच्छाडपर्यंत व नाशिक पालघरपर्यंत महामार्गाचा आढावा घेतला आहे. महामार्गावर मार्गिका चिन्हांकित करणे, वेगमर्यादा फलक, वळणावर दिशादर्शक फलक बसविणे, सिग्नल यंत्रणा, वळणाच्या रस्त्यावर धोकादायक असलेल्या झाडांची छाटणी अशा उपायांसाठी अहवाल तयार करण्यात आला आहे. हा अहवाल तयार करून महामार्ग प्राधिकरण यांना दिला जाणार असल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी दशरथ वाघुले यांनी सांगितले आहे.



CamScanner

RNI : MAHMAR/2019/7868

जनसामान्यांच्या विचारांचा आरसा

# पालघर मिरर

वर्ष : ४ | अंक : ५३ | बुधवार २९ मार्च ते मंगळवार ४ एप्रिल २०२३ | जिल्हा : पालघर | पाने : ८ | मूल्य : ३ रुपये

# शहरातील भटक्या श्वानांची एकदाही गणना झाली नाही



## श्वानदंशाची अधिकृत आकडेवारीच महानगरपालिकेकडे उपलब्ध नसल्याचे निष्पन्न

**एच.एस. दसोनी / पा. मि., वसई**

वसई-विरार शहरात पालिकेच्या स्थापनेपासून अद्याप श्वानगणना झाली नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. यामुळे श्वानदंश रोखणे, श्वानांचे निर्बिजीकरण करण्यात पालिका अपयशी ठरत आहे. दुसरीकडे श्वानदशांच्या घटना वाढत असताना श्वानदंशावरील उपचाराची खासगी रुग्णालयांची माहिती पालिकेकडे येत नसल्याने नेमके श्वानदंश किती झाले याची खरी आकडेवारीच उपलब्ध होत नाही.

भटक्या श्वानांच्या समस्येने वसई-विरारमधील नागरिक त्रस्त आहेत. रस्त्यांवर, गल्ली बोळात श्वानांची संख्या वाढली आहे. त्यामुळे श्वानदंशाच्या घटनादेखील वाढत आहे. रात्री-बेरात्री पायी जाणाऱ्यांवर श्वानांकडून हल्ले होत आहेत. रस्त्यांवर श्वानांच्या मलमुत्र विसर्जन करण्यामुळे शहर अस्वच्छ होत आहे. रस्त्यावरून जाणाऱ्यांच्या अंगावर भुंकणे, दुचाकीचा पाठलाग करण्यामुळे अनेक अपघात होत आहेत. श्वानांच्या उपद्रवाची ही समस्या सोडविण्यासाठी श्वानांच्या संख्येवर मर्यादा घालणे आवश्यक आहे. त्यासाठी श्वान निर्बिजीकरण करावे लागते.

**पान 4 वर**



> शहरातील श्वानांची संख्या आणि मांजरची संख्या किती आहेत याची लवकरच गणना केली जाणार आहे.
>
> **- चारुशीला पंडित,** उपायुक्त : वसई-विरार महापालिका

> गेल्या अनेक वर्षांपासून शहरातील श्वान गणना करावी अशी मागणी करत होती. मात्र कुणीही या विषयी गंभीरतने घेतले नाही आणि गणना झाली नव्हती.
>
> **- पुष्पा सभापती,** श्वानमित्र

### श्वानदंशाची पालिकेकडे असलेली माहिती

| वर्ष | शासकीय | खासगी |
|---|---|---|
| २०१७ | ६,६२६ | २२ |
| २०१८ | ९,६०६ | ३० |
| २०१९ | १४,२२५ | १८ |
| २०२० | १२,४९० | १५ |
| २०२१ | १३,७६८ | २० |
| २०२२ | १२,३८५ | १६ |

**गर्दीच्या चेहऱ्यात बिन चेहऱ्यांचे वाढते मृत्यु :** शहरात आढळत आहेत बेवारस मृतदेह

# पोलिसांनी केले 158 बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कार

**एच.एस. दसोनी / पा. मि., वसई**

वसई-विरार आणि मीरा-भाइंदर शहरात मोठ्या प्रमाणावर बेवारस मृतदेह आढळून येत आहेत. २०२२ या एका वर्षात शहरात तब्बल १५८ बेवारस मृतदेह आढळून आले होते. त्यांच्यावर पोलिसांकडून अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. बेवारस मृतदेह आढळण्याचे प्रमाण वाढत असल्याने त्यांची ओळख पटविण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

वसई-विरार शहराची लोकसंख्या सतत झपाट्याने वाढत आहे. शहरात विविध ठिकाणांहून नागरिक स्थलांतरीत होऊन राहण्यासाठी येत आहेत. यामुळे सध्या शहराची लोकसंख्या



सध्याच्या घडीला २५ लाखांहून अधिक झाली आहे. प्रत्येक व्यक्ती हा कुटुंबाशी, नातलगांशी जोडलेला असतो. त्यामुळे त्याच्या पश्चात त्याला खांदा द्यायला चार माणसं जमा होतात. पण अवाढव्य गर्दीच्या शहरात ओळख नसलेल्यांची संख्या देखील वाढत आहे. त्यामुळे मृत्यूनंतर त्यांची दखल घेणारे कुणी नसतात. अशा बेवारस मृतदेहांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयात २०२२ या वर्षात तब्बल १५८ बेवारस मृतदेह आढळले.

**पान 4 वर**

CS CamScanner

# शहराच्या सुभोभिकरण केलेल्या चौकांवर राजकीय पोस्टरबाजी






**पा. मि., वसई**

पालिकेने शहराचे सौंदर्यीकरण हाती घेतले असताना दुसरीकडे विविध राजकीय पक्षांकडून शहाराच्या सुभोभिकरणात अडथळा निर्माण केला जात आहे. जागोजागी पत्रके, झेंडे लावून शहर अस्वच्छ करण्यात येत आहे. या राजकीय पोस्टरबाजीमुळे शहर बकाल होऊ लागले आहे.

वसई-विरार महापालिकेने शहराचे सुभोभीकरण हाती घेतले असून त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जात आहे. या उपक्रमाअंतर्गत शहरातील मुख्य नाक्यांवर सजावट करून चौक उभारण्यात आले आहे. त्यामध्ये शिल्प आणि देखावे साकारण्यात आले आहे. त्यामुळे शहराच्या सौंदर्यात वाढ होत आहे. मात्र राजकीय पक्षांकडून या सुभोभित केलेल्या चौकांवरच पक्षाचे झेंडे लावण्यात आले आहेत. याशिवाय जागोजागी राजकीय पक्षांच्या सभा, नेत्यांचे वाढदिवस, सणांचे शुभेच्छा देणारे फलक लावण्यात आली आहेत. या राजकीय पक्षांच्या कचऱ्यामुळे शहराचे सौंदर्यीकरणाला बाधा निर्माण झाली आहे. आपल्या जाहिरनाम्यात शहर स्वच्छ सुंदर बनविण्याची घोषणा करणाऱ्या राजकीय पक्षांना आपण शहर बकाल बनवत आहोत याचे भान नाही.

## नाव क्रमांक लिहिणे बंधनकारक

पालिका या अनधिकृत होर्डिंग, पोस्टरवर हटवत असते. मात्र बेकायदेशीरपणे झेंडे लावणाऱ्या, पत्रके उभारणाऱ्यांवर कारवाई होत नाही. प्रत्येक पत्रकावर त्याच्या प्रकाशकाचे नाव आणि क्रमांक छापणे बंधनकारक असतानादेखील लिहिले जात नाही. यामुळे कारवाई कुणावर करायची असा प्रश्न पडला आहे.

निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली की प्रत्येक गोष्टींचा हिशोब द्यावा लागतो. कुठेही पत्रक, होर्डींग लावताना परवानगी घ्यावी लागते, पत्रके किती छापली कुणी छापली त्याची माहिती पत्रकावर द्यावी लागते अन्यथा गुन्हा दाखल होतो. परंतु हे निवडणूक आचारसंहितेच्या काळातच होत असते. त्यामुळे अशी आचारसंहिता कायम लावावी आणि बेकायदेशीरपणे शहरात होर्डींग लावून, पोस्टर्स चिपकवून शहर अस्वच्छ करणाऱ्यांना आळा घालावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

> शासनाची कोणतेही परवानगी न घेता शहरामध्ये जे पोस्टर व बॅनर्स लावतात त्यांच्यावर महानगरपालिकेने गुन्हा नोंदवला पाहिजे.
>
> **- हरीश गौड,**
> **वकील - वसई**

पान 1 वरून

# शहरातील भटक्या श्वानांची एकदाही गणना झाली नाही

परंतु शहरात नेमके भटके श्वान किती याची आकडेवारीच पालिकेकडे नाही. कारण पालिकेच्या स्थापनेपासून अद्याप श्वानांची गणनाच झाली नसल्याचे उघड झाले आहे. शहरातील भटक्या जनावरांची गणना करणे पालिकेला बंधनकारक आहे. शहरातील भटक्या श्वानांची दर पाच वर्षांनी एकदा गणना करणे महापालिकांना बंधनकारक आहे. तसा अध्यादेश राज्य शासनाने काढला होता. केंद्र शासनानेही या संदर्भात अध्यादेश काढला आहे. परंतु पालिकेच्या बेपर्वा वृत्तीमुळे अद्याप श्वान गणना झालेली नाही. यामुळे शहरात नेमकी भटकी श्वानं किती आहेत याची अधिकृत आकडेवारी नाही. त्याचा परिणाम श्वान निर्बिजीकरणावर होत आहे. अद्याप शहरात श्वान गणना झाली नसल्याचे कबुली प्रभारी सहाय्यक आयुक्त मनाली शिंदे यांनी दिली.

## श्वानदंशांची अधिकृत आकडेवारीच नाही

श्वान दंशांच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. प्रत्येक श्वानदंशांची नोंद पालिकेकडे असणे आवश्यक आहे. मात्र वसई-विरार महापालिकेकडील माहितीत तफावत आहे. कारण पालिकेकडे फक्त पालिका रुग्णालयात आलेल्या रुग्णांची माहिती असते. खासगी रुग्णालयांमध्ये श्वानदंशाच्या उपचारासाठी आलेल्या रुग्णांची माहिती पालिकेला कळवणे बंधनकारक आहे. मात्र खासगी रुग्णालये अशी माहिती पालिकेला देत नाही. पालिकादेखील अशा रुग्णालयांकडून श्वानदंशाची माहिती घेत नाहीत. त्यामुळे शहरात श्वानदंशाच्या नेमक्या घटना किती त्याची अधिकृत आकडेवारीच उपलब्ध नाही. उदारहणार्थ २०२२ या वर्षात पालिकेकडे असलेल्या खासगी रुग्णालयात १२ हजारांहून अधिक श्वानदंशाच्या घटनांची नोंद झाली तर खासगी रुग्णालयांकडे केवळ २२. श्वानदंश होणारी व्यक्ती जवळच्या खासगी दवाखाने किंवा रुग्णालयात आधी धाव घेतो. त्यामुळे संख्या अधिक असणं शक्य आहे. त्यामुळे खासगी रुग्णालयांकडील श्वानदशांची खरी माहिती पालिकेला मिळत नाही.

# पोलिसांनी केले 158 बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कार

त्यांच्या मृत्यू विविध नैसर्गिक कारणांमुळे झाला होता. काहींचा मृत्यू आजाराने तर काहींचा मृत्यू अपघाताने झाला होता. त्यापैकी केवळ २५ मृतदेहांची ओळख पटवता आली आहे. उर्वरित १५८ बेवारस मृतदेहांवर पोलिसांनीच अंत्यसंस्कार केले आहेत. या बेवारस मृतदेहांमध्ये महिलांची संख्यादेखील अधिक आहे. कोण आहेत ही माणसे? कुठून आली? काय करत होती? याचा काहीच थांगपत्ता लागलेला नाही. गर्दीच्या चेहऱ्यात विनचेहऱ्यांच्या माणसांचा मृत्यू ही चिंतेची बाब बनली आहे

## सर्वात जास्त बेवारस मृतदेह परिमंडळ 3 मध्ये

मीरा-भाईंदर परिमंडळ एकमध्ये २०२२ या वर्षात ५३ अनोळखी मृतदेह आढळले. त्यातील केवळ ८ मृतदेहांची ओळख पटली. पोलिसांतर्फे त्यातील तब्बल ४९ मृतदेहांवर अंत्य संस्कार करण्यात आले. वसई पोलीस परिमंडळ २ मध्ये वर्षभरात ५५ अनोळखी मृतदेह सापडले. त्यापैकी ५ मृतदेहांची ओळख पटली तर ५३ मृतदेहांवर पोलिसांनी अंत्यसंस्कार केले. विरार पोलीस परिमंडळ ३ मध्ये सर्वात जास्त ७० अनोळखी मृतदेह गेल्या वर्षी आढळले. त्यातील १२ मृतदेहांची ओळख पटली तर ५६ अनोळखी मृतदेहांवर पोलिसांनी अंत्यसंस्कार केले.

## असे होतात बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कार

मृतदेहाचे वारस सापडावेत व त्यांची ओळख पटावी यासाठी मृतदेह ७ दिवस शवागारात ठेवला जातो. त्याची माहिती स्थानिक दैनिकांतून जाहीर करून त्याच्या वारसांना संपर्क करण्याचे आवाहन केले जाते. वारस सापडले नाही तर बेवारस म्हणून मृतदेहावर अंत्यविधी करण्याचे कार्य पोलीस पार पाडतात. अनेकदा समुद्रकिनाऱ्यावर बेवारस मृतदेहांचे दफन केले जाते. बेवारस मृतदेहांवर दफन करण्यासाठी जागेची मागणी करण्यात आली होती. वसईच्या सनसिटी येथे सर्वधर्मीय दफनभूमी तयार करण्यात येत आहे. त्या ठिकाणी बेवारस मृतदेहांचे दफन करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**2022 या वर्षात मीरा-भाइंदर, वसई-विरार आयुक्तालयात आढळेले बेवारस मृतदेह**

परिमंडळ १ (मीरा-भाइंदर): ५९
परिमंडळ २ (वसई): ५३
परिमंडळ ३ (विरार): ५६
**एकूण : 158**

CS CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-289 मुंबई, मंगलवार 4 अप्रैल 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# सीसीटीवी कैमरे की पैनी नजर में पात्र अभ्यर्थियों की लिखित परीक्षा शांतिपूर्वक संपन्न

**वसई:** मीरा-भाईंदर, वसई-विरार - महाराष्ट्र पुलिस भर्ती 2021 के तहत योग्य उम्मीदवारों की लिखित परीक्षा 2 अप्रैल को पुलिस आयुक्तालय कार्यालय के माध्यम से आयोजित की गई है।परीक्षा के लिए कुल 12,127 पात्र उम्मीदवार थे।बड़ी संख्या पुलिस बल में पात्र अभ्यर्थियों की लिखित परीक्षा शांतिपूर्वक संपन्न हो गई है।पुलिस कमिश्नरेट ने बताया है कि परीक्षा के दौरान कोई कदाचार नहीं हुआ।मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय में कम जनशक्ति की समस्या जल्द दूर होगी, लिखित परीक्षा पास करने के बाद आयुक्तालय को 996 पुलिस कांस्टेबल मिलेंगे।लिखित परीक्षा के लिए आयुक्तालय द्वारा नेताजी सुभाष चंद्र बोस मैदान और स्वर्गीय बालासाहेब ठाकरे मैदान का चयन किया गया था,लिखित परीक्षा के लिए कुल 12, 127 योग्य उम्मीदवार थे। इनमें 3,269 महिलाएं और 8,858 पुरुष थे,महिलाओं के लिए लिखित परीक्षा स्वर्गीय बालासाहेब ठाकरे मैदान में आयोजित की गई थी, जबकि पुरुषों के लिए लिखित परीक्षा सुभाष चंद्र बोस मैदान में आयोजित की गई थी।कदाचार को रोकने और उम्मीदवारों की निगरानी के लिए भर्ती



परीक्षा के दौरान लगभग 50 कैमरे लगाए गए थे। पुलिस की सीसीटीवी,भर्ती कंपनी के कैमरों और हैंडीकैमरा द्वारा फिल्माया गया है,इस वजह से पूरी प्रक्रिया पर कैमरे की पैनी नजर है,चूंकि पहली बार आधुनिक तकनीक की मदद से भर्ती प्रक्रिया की जा रही है, इसलिए आने वाले हर उम्मीदवार को एक कंप्यूटर चिप से इम्प्लांट किया गया है.और, इनमें से प्रत्येक उम्मीदवार को कंप्यूटर में पंजीकृत किया गया है।अभ्यर्थियों के नामांकन की प्रक्रिया सुबह पांच बजे शुरू हुई,भर्ती प्रक्रिया के लिए सुरक्षा के कड़े इंतजाम किए गए थे।पुलिस अधिकारी ने बताया कि नेताजी सुभाष चंद्र बोस के पास 235 अधिकारी और 743 कर्मचारी हैं और एक एसआरपीएफ और एक आरसीपी कंपनी व दिवंगत बालासाहेब ठाकरे मैदान में 84 अधिकारी और 771 कर्मचारी और एक आरसीपी प्लाटून तैनात थे। फिलहाल, अभ्यर्थियों के लिए शौचालय, पीने का पानी और नाश्ता जैसी सुविधाएं मुहैया कराई गईं।

CamScanner

# महिला सहित 2 चोर गिरफ्तार 6 मामलों का खुलासा

वसई। एमबीवीवी पुलिस आयुक्तालय क्राइम ब्रांच 3 विरार यूनिट ने एक बड़ी सफलता अर्जित की है। दरअसल टीम ने महंगी कारों से टेप चुराने वाले गिरोह का पदार्फाश किया है। इस मामले में टीम ने 2 चोरो को दबोच कर,1 लाख से अधिक का माल जप्त करते हुए 6 अपराधों (चोरी ) की गुत्थी सुलझा ली है। यह कार्रवाई क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 3 के पी.आई प्रमोद बडाख व पीएसआई शिवाजी खाड़े व उमेश भागवत की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने सोमवार को दी। पुलिस ने बताया कि 24 मार्च को शिकायतकर्ता सौमील संदीप मनकीकर की मारुती सुझुकी कंपनी वैगनार कार क्र. एमएच 1/ए.आर 4175 घर के परिसर में पार्क की थी,सुबह लगभग 9;52 के आसपास जब शिकायतकर्ता गाड़ी के पास गई तो गाड़ी का कांच टूटा हेतु पड़ा था,गाड़ी से



चेक की तो किसी अज्ञात चोर ने गाड़ी से एलईडी म्यूजिक सिस्टम चोरी कर फरार हो गया है।इस मामले में शिकायतकर्ता मनकीकर ने विरार थाने में अज्ञात चोर के खिलाफ केस दर्ज करवाई थी।पुलिस अधिकारी ने बताया कि मीरा-भाईदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय क्षेत्राधिकार में, महंगी कारों के शीशे तोड़कर म्यूजिक सिस्टम/टेप चोरी करने के संबंध में थानों में मामले दर्ज किए गए थे।वरिष्ठों ने उक्त घटनाओं को गंभीरता से लेते हुए आरोपियों को खोजने और अपराधों का पदार्फाश करने के संबंध में निर्देश और मार्गदर्शन दिया था.उक्त दर्ज अपराध की आगे की जांच वरिष्ठ द्वारा क्राइम ब्रांच यूनिट 3, विरार को सौंपी गई।पुलिस ने कहा कि तद्नुसार गुप्त मुखबिर द्वारा प्राप्त सूचना एवं तकनीकी विश्लेषण के आधार पर क्राइम ब्रांच युनिट 3, विरार के अधिकारी एवं कर्मचारी ने महिला आरोपी (1).अंजु मुकेश वधानी व (2).सरीता गणेश लिंगम ,दोनो आरोपी नालासोपारा पूर्व निवासी को 30 मार्च को हिरासत में लिया। उपरोक्त नामजद महिला आरोपी ने नाबालिग बालक की मदद से उपरोक्त अपराध को अंजाम दिया,ऐसा खुलासा हुआ। उक्त गिरफ्तार महिला आरोपी द्वारा अपराध करने में इस्तेमाल की गई एक्टिवा मोटर साइकिल व चोरी के 6 म्यूजिक सिस्टम/कारटेप कुलमिलाकर 01,06,550 रुपये का माल जप्त किया व 6 मामलों का पदार्फाश हुआ है।

CS CamScanner





### नालासोपारा शहराचे प्रवेशद्वार बकाल आणि अस्वच्छ

# अतिक्रमणे, भंगारवाल्यांमुळे शहराची प्रतिमा मलीन

**एच. एस. दसौनी / पा. मि., वसई**

शहराच्या प्रवेशद्वारावरून शहराची प्रतिमा समोर येत असते. मात्र नालासोपारा शहरात प्रवेश करताना अडगळ, भंगार आणि दुर्गंधीचा सामना करावा लागतो. शहराच्या वेशीपासून सुरू झालेले अतिक्रमण आणि त्यांच्या अस्ताव्यस्त रचनेमुळे प्रवेशद्वारच बकाल झाले आहे. त्यामुळे नाक मुरडून नागरिकांना शहरात प्रवेश करावा लागत आहे. शहर स्वच्छतेसाठी कोट्यवधी रुपये खर्च करणाऱ्या पालिकेने शहराच्या प्रवेशद्वाराची घाण साफ करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

निसर्गाने नटलेलं सुंदर हरित शहर, अशी वसई शहराची ओळख होती. या शहराच्या पश्चिम पट्ट्यात अथांग अरबी समुद्र आणि हिरवीगार वनराई आहे. परंतु गेल्या काही वर्षांपासून अनधिकृत बांधकामे आणि त्यातून आलेल्या बकालपणामुळे शहराचा चेहरामोहरा बदलला आहे. त्यात सर्वाधिक बकालपणा हा नालासोपारा पूर्वेला आला आहे. नालासोपारा पूर्वेला धनिव बाग, संतोषभुवन, नगीनदास पाडा, वाकणपाडा अशा अनधिकृत वसाहती तयार होऊ लागल्या. अनधिकृत बांधकामांचे हे लोण थेट महामार्गापर्यंत पोहोचले



आणि चाळींपासून व्यावसायिक गाळे, गोदामे तयार होऊ लागले. नालासोपारा शहरात प्रवेश करताना या बकालपणाची झलक दिसते. दुकानदारांनी रस्त्यावर अतिक्रमण करून आपले भंगार साहित्य ठेवले आहे. गॅरेजेस, भंगाराची दुकाने, बांधकामाचे साहित्य, कारखान्यातील साहित्य महामार्गाच्या प्रवेशद्वारापासून सुरू झालेल्या रस्त्यावर ठेवण्यात आले आहे. अनधिकृतपणे वसलेल्या टपऱ्या, खाद्यपदार्थांची दुकाने आणि फेरीवाल्यांची त्यात भर पडली आहे. यामुळे नालासोपारा शहरात प्रवेश करताना एकप्रकारची शिसारी येते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या अतिक्रमणांमुळे परिसर अस्वच्छ झाला आहे. रस्त्याच्या दुतर्फा कचरा आणि भंगार साहित्य अस्ताव्यस्त पडले आहे. परप्रांतीयांनी शहरात येताना त्यांच्यासोबत त्यांच्या शहरातील बकालपणादेखील आणला आहे. आपले शहर आहे ते स्वच्छ ठेवायला हवे अशी भावना त्यांच्यात नसते. त्यामुळे त्यांच्याकडून गचाळपणा, गलिच्छपणा होत असतो. प्रवेशद्वाराकडील बकालपणामुळे शहराची मलीन प्रतिमा तयार झाली आहे. पालिकेने शहराच्या सुभोभिकरणावर कोट्यवधी रुपये खर्च करताना शहराच्या प्रवेशद्वारावरील अतिक्रमणे काढून प्रवेशद्वार मोकळा करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



> हा विषय अतिशय गंभीर असून मी स्वतः या परिसराची पाहणी करून त्यांच्यावर लवकरच कारवाई करण्यात येणार आहे.
>
> **- अजित मुठे,** उपायुक्त, व. वि. म.पा.

# सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस निरीक्षकांचा सत्कार !

**पा. मि., वसई**

फेब्रुवारी महिन्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकित पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विविध गुन्ह्यांत गुन्ह्याचा यशस्वी माग काढत सदर पोलीस अधिकाऱ्यांनी कायदा-सुव्यवस्थेची बुज राखण्याचा प्रयत्न केला आहे. या सत्कारमुर्तीत काशिमीरा पोलीस ठाण्याच्या गुन्हे शाखा कक्ष १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक पुष्पराज सुर्वे, कैलास टोकले, तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर, वसई पोलीस ठाण्याचे गुन्हे शाखा कक्ष-२ चे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे तसेच पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचा समावेश आहे. सर्व पोलीस अधिकाऱ्यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यात फेब्रुवारी महिन्यातील ५३ वाहने चोरी करणारी टोळी जेरबंद करून २२ गुन्ह्यांची उकल, ब्रीजखाली डोक्यात दगड मारून हत्या करणाऱ्या आरोपीला २४ तासांत जेरबंद, लिव्ह अँड रिलेशनशिपमध्ये हत्या करून पळालेल्या प्रियकराला अटक, १५७ नागरिकांची करोडो रुपयांची फसवणूक करणारी टोळी, इंस्टाग्राम आयडीवरून मुलीसोबत लैंगिक छळ करणाऱ्या आरोपीला अटक आणि चोरीचे ५३ मोबाईल हस्तगत केले. या गुन्ह्यांची उकल करणाना पोलीस निरीक्षकांना शुक्रवारी पोलीस आयुक्तांच्या हस्ते सर्वोत्कृष्ट तपासाचे प्रशस्तीपत्रक आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे. पोलीस आयुक्तालयात या सहा गुन्ह्यांचा पर्दाफाश करून उलगडा करत 'सर्वोत्कृष्ट तपास' ठरला आहे. पोलीस आयुक्तालयातर्फे दर महिन्याला सर्वोत्कृष्ट तपास करणाऱ्या पोलिसांचा सन्मान करण्यात येतो. साडेचार करोड रुपये किंमतीचे ४८ आयशर टेंपो, २ टाटा टेंपो, १ अशोक लेलंन्ड टेंपो, २ क्रेटा कार अशी ५३ वाहने जप्त करून दोन आरोपींना अटक करत २२ गुन्ह्यांची उकल केल्याप्रकरणी गुन्हे शाखेच्या युनीट एकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुऱ्हाडे आणि त्यांच्या पथकाने उत्कृष्टपणे तपास केला.

तुळींज ओव्हर ब्रीजखाली २५ फेब्रुवारीच्या रात्री सिमेंटचा दगड डोक्यात घालून मित्राची हत्या केली होती. तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपी मित्राला तुळींजच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलिसांनी गुप्त बातमीदार व सीसीटीव्ही फुटेजच्या तांत्रिक विश्लेषणाद्वारे २४ तासांत आरोपी दीपक गुप्ता उर्फ बटला याला अटक केले होते. आरोपीने ही हत्या फक्त २८० रुपयांसाठी केली होती.

# 75 held with illegal guns in 4 years

SURESH GOLANI
MIRA-BHAYANDAR

With the arrest of one person recently who was found to have a country-made pistol in Mira Road, the number of illegal firearms recovered by the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police has reached five in the first three months of 2023.

While seven people found to be carrying illegal arms have been arrested this year, 75 people were arrested and 43 country-made guns were recovered from 2019 to 2022.

Apart from 319 cartridges, authorities have seized firearms including 32 country-made weapons and 12 pistols.

While cases under the Maharashtra Police Act-1951 and Arms Act are registered against the accused, who mostly turn out to be just carriers, the actual masterminds of the racket are rarely exposed. Moreover, the actual origin and destination of firearms remain unknown in most cases.

CS CamScanner